N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर **P.S.(ठाणे):** वडगांव **Year (वर्ष):** 2020

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0105 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 06/03/2020 01:43 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार

**Date From (दिनांक पासून):** 05/03/2020

**Date To ( दिनांक पर्यंत):** 05/03/2020

**Time Period (कालावधी):** पहर 5

**Time From (वेळेपासून):** 14:12 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 15:35 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 06/03/2020 **Time (वेळ):** 01:20 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 004 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 06/03/2020 01:20 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पश्चिम, 8 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** तळसंदे ग्रामपंचायत कार्यालयामध्, तळसंदे, ,ताहातकणंगले

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** मारूती राजाराम नलवडे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1973 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

(h) **Address** (पत्ता):

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | तळसंदे, ,ता हातकणंगले,वडगांव ,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | तळसंदे, ,ता हातकणंगले,वडगांव ,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.): **Mobile** (मोबाइल नं.): 91-8624883605

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | रायसिंग गोरजी वळवी | | | 1. प्लॉट नं ,शंकर रेसिडेन्सी,,शिंगणापूर,, करवीर,करवीर,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 2000/ची 01 व रु. 500/ दराच्या 07 नोटा | 5,500.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)): 5,500.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद दिनांक- 06/03/2020 मी मारुती राजाराम नलवडे, वय - 47, व्यवसाय - खाजगी नोकरी, रा. तळसंदे, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर, मो.नं. 8624883605, आज रोजी समक्ष पोलीस ठाणेत हजर राहून फिर्याद देतो की, मी वरील पत्यावर माझे घरच्यांसोबत राहाणेस आहे. मी खाजगी नोकरी करतो. तसेच गावी माझे वडीलार्जीत घर असुन सदरचे घर अजुनही माझे मयत वडीलांचे नावे आहे. माझे वडील राजाराम वडर हे सन 2002 मध्ये मयत झाले असुन त्याअगोदर म्हणजे दिनांक 16/02/1995 रोजी माझी आई सावित्री राजाराम वडर ही मयत झालेली आहे. मी माझे मुळ आडनाव सुमारे चार पाच वर्षापुर्वी अँफिडेव्हिट करून वडर चे नलवडे असे बदलुन घेतलेले आहे.माझे सध्या राहत असलेले घर अद्याप वडीलाचे नावावर असुन ते माझे नावावर करायचे आहे. त्यासाठी मला माझे वडील व आईचा मृत्यु दाखल्यांची गरज आहे. त्यापैकी वडीलांचा मृत्यु दाखला माझेकडे उपल्बध असुन आई सावित्री हिचा मृत्यु दाखला घेण्यासाठी मी ग्रामपंचायत कार्यालयात काल दि.04/03/2020 रोजी लेखी अर्ज देणेसाठी गेलो होतो. तेव्हा ग्रामसेवक वळवी यांना माझा अर्ज वाचुन मला, तुझ्या आईचा मृत्यु 1995 साली झाला असल्याने मृत्युचा दाखला काढुन देण्यासाठी मला 6,000/- द्यावे लागतील मगच मी तुला तुझ्या आईचा मृत्युचा दाखला देतो असे म्हणुन लाचेची मागणी केल्याने व ती लाच रक्कम मला द्यावयाची नसलेने मी त्याचदिवशी दि. 04/03/2020 रोजी सायंकाळी अँन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे जावुन पोलीस उपअधीक्षक साहेबांची भेट घेवुन माझी वरीलप्रमाणे थोडक्यात तक्रार सांगितली. तसेच ग्रामसेवक वळवी यांना दि. 05/03/2020 रोजी भेटणेस जाणार असल्याचे सांगुन त्यांचेवर कारवाई करण्याची विनंती केली होती. त्यावेळी ऑफिसची वेळ संपल्याने पोलीस उपअधीक्षक बुधवंत साहेबांनी मला दि. 05/03/2020 रोजी तळसंदे येथे भेटुन माझे तक्रारीप्रमाणे कारवाई करू असे सांगुन मला तक्रारीबाबत गोपनीयता राखणेबाबत सुचना देवुन घरी पाठविले होते. आज दुपारी 13.30 वा चे सुमारास अँन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूरकडील पोलीस निरीक्षक सरनोबत साहेबांचा मला फोन आला, तेव्हा त्यांनी माझे तक्रारीप्रमाणे कारवाई करण्यासाठी मला तळसंदे येथे येत असल्याचे सांगितले असता, मी त्यांना वाठार ते तळसंदे जाणारे रोडवरील जोतिबा हाँटेल, लाँजिंग व बोर्डींग शेजारी आतील रस्त्यावर रोडवर येवुन भेटणेस सांगितले. थोडयावेळाने तेथे पोनि सरनोबत, दोन पंच व त्यांचेकडील स्टाफ असे त्यांचेकडील टाटा सुमो गाडीने आले. सरनोबत साहेबांनी मला गाडीजवळ बोलवुन माझी ओळख विचारली. मी माझे नाव व पत्ता त्यांना सांगितलेवर, त्यांनी आपली ओळख सांगून त्यांचेकडील स्टाफ व पंचांची ओळख करुन दिली. त्यानंतर त्यांनी मला गाडीमध्ये बोलवुन घेतले तेव्हा मी त्यांना माझा लेखी तक्रारी अर्ज दिला होता. तेव्हा पोनि सरनोबत साहेबांनी मी दिलेला अर्ज वाचुन पाहिला व नंतर मला माझी तक्रार पंचांना सांगणेची सुचना दिली. त्याप्रमाणे मी माझी तक्रार पंचांना सांगितली. त्यानंतर श्री.सरनोबत साहेबांनी मी दिलेला तक्रारी अर्ज पंचांना वाचण्यास दिला. मी सांगितलेली तोंडी तक्रार व लेखी तक्रार एकच असलेची पंचांची खात्री झाली. त्यानंतर श्री.सरनोबत साहेबांनी आपण सही केली व त्यांचे सुचनेनुसार दोन्ही पंचांनी माझे लेखी

तक्रारीखाली सह्या केल्या. श्री.सरनोबत साहेबांनी मला व दोन्ही पंचांना ग्रामपंचायत तळसंदे येथील ग्रामसेवक वळवी हे माझेकडे लाचेची मागणी करतात अगर कसे? याबाबत प्रथम पडताळणी करणार आहोत असे सांगितले. तसेच पडताळणीकरीता मी ग्रामसेवक वळवी यांना भेटणेस जाताना माझेसोबत पंच नं.1 श्री.बंके यांना पाठवणार असल्याचे सांगितले. त्यानंतर त्यांनी शासकीय वाहनामध्येच त्यांचे कार्यालयाकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून त्यामध्ये नवीन मायक्रो एसडी कार्ड घालून त्यामध्ये पुर्वीचे कोणत्याही प्रकारचे संभाशण ध्वनिमुद्रीत नसल्याची माझी व पंचांची खात्री करून दिली. मला व पंच श्री.बंके यांना पडताळणी कारवाईबाबत योग्य त्या सुचना देवुन त्यांचेकडील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर 14.12 वा. चालू करुन तो माझे गळयात अंगावरील शर्टचे आतील बाजुस काळया दोयाचे सहायाने अडकवून दिला व मला आणि पंच श्री.बंके यांना माझेकडील मोटर सायकलने तळसंदे ग्रामपंचायत कार्यालयात ग्रामसेवक वळवी यांची भेट घेणेकरीता पाठविले. मी व पंच बंके असे मिळुन कार्यालयात गेलो, तेथे ग्रामसेवक वळवी हे त्यांचे टेबलवर बसले होते त्यांचेसमोर बसुन मी त्यांचेसोबत माझे आईचा मृत्यु दाखला देणेबाबत चर्चा केली त्यावेळी ग्रामसेवक वळवी यांनी माझेकडे पाच ते सहा हजार खर्च येतोय असे म्हणुन तडजोडीअंती 5,500/- रू. लाचेची मागणी करून लाच रक्कम लागलीच घेवुन येण्यास सांगितले. तेव्हा मी त्यांना लाच रक्कम थोडयावेळाने घेवुन येतो, असे सांगुन पंच बंके यांचेसह माझे मोटर सायकलवरून पोनि सरनोबत व त्यांचा स्टाफ थांबलेल्या ठिकाणी परत आलो. तेव्हा सरनोबत साहेबांनी मला त्याचेकडील गाडीमध्ये बोलवुन माझेकडील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर 14.54 वा. बंद करुन आपले ताब्यात घेतला. श्री.सरनोबत साहेबांनी मला गाडीतुन बाहेर थांबणेस सांगुन पहिल्यांदा पंच बंके यांचेशी चर्चा केली. त्यानंतर मला परत गाडीमध्ये बोलवुन त्यांनी माझेकडे घडलेल्या घटनेबाबत विचारणा केली असता, मी त्यांना वरीलप्रमाणे हकीकत सांगितली. तेव्हा सरनोबत साहेबांनी डिजीटल रेकॉर्डरमधील माझे आणि ग्रामसेवक वळवी यांचेतील लाच मागणी संदर्भातील ध्वनीमुद्रीत संभाषण ऐकले. सदर ऐकले संभाशणावरुन व पंच श्री.बंके आणि माझे सांगणेवरुन ग्रामसेवक वळवी यांनी मला माझे आईचा मृत्यु दाखला देणेसाठी तडजोडीअंती 5,500/- रू. लाचेची मागणी करून लाच रक्कम लागलीच घेवून येणेस सांगितलेचे निश्पन्न झाले.ग्रामसेवक वळवी यांनी पैसे घेवून लागलीच बोलाविले असलेने श्री.सरनोबत साहेबांनी मला व पंचांना सापळा पुर्व पंचनामा सुरु करीत असलेचे सांगितले. त्यानंतर मला सरनोबत साहेबांनी ग्रामसेवक वळवी यांना देणेसाठीची लाच रक्कम हजर करणेस सांगितले. त्यावेळी मी माझेकडे उपलब्ध असलेले रू.2000/-ची 01 व रु. 500/- दराच्या 07 नोटा असे मिळुन रु. 5,500/- लाच म्हणून देणेसाठी हजर केले. तेव्हा सरनोबत साहेबांनी त्यांचेकडील स्टाफमार्फत नोटांचे नंबर्स लिहून घेतले, तसेच मोबाईलवर नोटांचा फोटो काढुन घेतला व मला आणि पंचांना अन्थ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायोलेट दिव्याचे उपयोग व गुणधर्म सांगितले. त्यानंतर मी हजर केलेल्या नोटांना शासकीय टाटा सुमो गाडीचे मधील सिटवर पांढरा कागद अंथरुन त्यावर लाच रक्कमेतील नोटा ठेवून पोकॉ देसाई यांनी ॲन्थ्रॉसिन पावडर लावली व गाडीमध्ये काळे कापडाचे सहाय्याने अंधार करुन नोटांची अल्ट्राव्हायोलेट बटरीचे सहाय्याने मला व पंचांना तपासणी करुन दाखविली. त्यावेळी त्या नोटांवर निळसर चकाकी असल्याचे दिसुन आले होते. त्यानंतर पोकॉ देसाई यांनी लाच रक्कम रु. 5,500/- च्या नोटांची घडी करून माझे शर्टचे डाव्या बाजुचे खिशामध्ये ठेवली. त्यानंतर सरनोबत साहेबांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मधील वापरलेले मेमरी कार्ड काढुन सुरक्षित आपले जवळ ठेवले व रेकॉर्डरमध्ये नवीन मायक्रो एसडी कार्ड घालून त्यामध्ये पुर्वीचे कोणत्याही प्रकारचे संभाशण ध्वनिमुद्रीत नसल्याची खात्री करून देवुन मला, दोन्ही पंच व सापळा पथकातील कर्मचा-यांना सापळ्याचे अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या.सरनोबत साहेबांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 15.26 चालु करुन तो माझे गळयात शर्टचे आतील बाजूस अडकविला. तेथून मला व पंच बंके यांना तळसंदे ग्रामपंचायत कार्यालयात ग्रामसेवक वळवी यांचेकडे पाठविले आणि आपण व त्यांचा स्टाफ आणि पंच नं. 2 पठाण असे त्यांचेकडील शासकीय वाहनाने आमचे पाठोपाठ आले. मी आणि पंच बंके ग्रामपंचायत कार्यालयाचे इमारतीचे वरच्या मजल्यावर गेलो तेथे ग्रामसेवक वळवी त्यांचे टेबलवर बसले होते. मी गेल्यावर त्यांनी शेजारील मडमकडुन माझा अर्ज मागवुन घेतला तसेच मला माझा मोबाईल नंबर व नाव विचारून घेवुन आई वडीलांचे नावाबाबत खात्री करून घेतली. माझे लेखी दिलेले अर्जावर चुक झाली होती त्यावर सही करणेस सांगुन पैसे आणलेत का असे विचारले. तेव्हा मी त्यांना लाच रक्कम रू. 5,500/- दिली. तेव्हा ग्रामसेवक यांनी ती उजव्या हाताने स्विकारून आपले दोन्ही हातांनी मोजत असतानाच त्यांनी मला फोन करतो असे सांगितलेने मी कार्यालयातुन बाहेर आलो. तसेच इमारतीचे खाली येवुन ग्रामसेवक वळवी यांनी लाच रक्कम स्विकारलेबाबतचा पुर्व नियोजित इशारा म्हणुन माझे पन्टचे डाव्या खिशातील हातरूमाल काढुन माझा चेहरा पुसून सापळा पथकास इशारा दिलेवर पोनि सरनोबत साहेबांनी माझेजवळ येवुन त्यांनी माझे गळयातील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर 15.35 वा बंद करून ताब्यात घेतला.त्यानंतर माझेकडे विचारपुस करून त्यांनी त्यांचे स्टाफसह ग्रामपंचायत इमारतीचे वरच्या मजल्यावर जावुन ग्रामसेवक वळवी यांना पकडले. त्यांचेकडून पंचामार्फत पोनि सरनोबत साहेब यांनी लाच रक्कम रु. 5,500/- जप्त केली. सदर प्रकरणाबाबत पोनि सरनोबत यांनी दि.05/03/2020 रोजी सविस्तर पडताळणी व सापळा पंचनामा केला आहे. त्यानंतर मला पोनि सरनोबत यांचेकडुन ग्रामसेवक वळवी यांचे पुर्ण नाव, पद व पत्ता रायसिंग गोरजी वळवी असे असुन त्यांचे पद ग्रामविकास अधिकारी - तळसंदे ग्रामपंचायत असे असल्याचे समजले. सदर कारवाईमध्ये ग्रामविकास अधिकारी रायसिंग वळवी, ग्रामपंचायत कार्यालय, तळसंदे यांनी मला माझे आईचा मृत्यु दाखला देणेसाठी माझेकडे 5,500/- रू. लाचेची मागणी करून ती लाच रक्कम स्विकारल्याने माझी त्यांचेविरूध्द माझी फिर्याद आहे.

13. **Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** PRADEEP SHIVAJI KALE(I (Inspector)) / PBMH75621 **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
**Rank (पद):**
**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15. Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

ठाणे अंमलदार
...गांव पोलीस ठाणे.

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): PRADEEP SHIVAJI KALE
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PBMH75621